# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ९७/2020 दिनांक: २१/ 03 /2020

## कोव्हीड- १९ आदेश

**कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोना करणे बाबत.**

**वाचा -**
1. **आपत्ती व्यवस्थापन कायदा -२००५**
2. **प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १४ मार्च, २०२०**
3. **साथरोग अधिनियम,१८९७**
4. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**
5. **महाराष्ट्र पोलीस अधिनियम -१९५१**

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड - १९ कोरोना विषाणू वर उपाययोजना **नियम-२०२०** नुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील **नियम क्र. ३** नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्या अर्थी**, अकोला जिल्हयातील सर्व प्रकारचे सोने-चांदीचे दुकाने, कापड, ऑटोमोबाईल, भांडयाची दुकाने, ईलेक्ट्रीक- ईलेक्ट्रॉनिक्स, टिंबर, प्लायवूड, व इतर सर्व प्रतिषठाने नागरीकांच्या होणा-या गर्दीमुळे कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव होण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून बंद ठेवणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे. तसेच यामध्ये जिवनावश्यक वस्तू , किराणा दुकान, औषधालय, फळे, भाजी दुकाने चालु ठेवणे आवश्यक आहे.

**त्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ , साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** व महाराष्ट्र शासनाची दिनांक १४ मार्च २०२० चे अधिसूचनेनूसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला या आदेशान्वये नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अकोला जिल्हयातील सर्व प्रकारचे सोने-चांदीचे दुकाने, कापड, ऑटोमोबाईल, भांडयाची दुकाने, ईलेक्ट्रीकल , ईलेक्ट्रॉनिक्स, टिंबर, हार्डवेअर, प्लायवुड,आठवडी बाजार, मोबाईल, सलुन, ब्युटी पार्लर, गॅरेज, हॉटेल्स , रेस्टॉरेन्ट, स्वीट मार्ट, लॉज, ढाबे, चहा नाश्ता टपरी, पान टपरी, व इतर सर्व प्रतिष्ठाने ( जिवनावश्यक वस्तु, किराणा दुकाने, औषधालये, फळे, भाजीपाला, दुध विक्री दुकाने वगळून ) दिनांक २२.०३.२०२० ते दिनांक ३१ /०३/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत चालु ठेवण्यास मनाई करण्यात येत आहे.**

--२..

NitinN 63

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** अन्वये शिक्षापात्र असलेला *अपराध* केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 29 **मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी अकोला यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,** आ.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
यांना माहिती करिता सादर
४. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
५. **मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हा परिषद अकोला.
६. **आयुक्त महानगर पालिका,** अकोला अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. यांनी कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
७. **जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, जिल्हा परिषद अकोला.
८. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी** -------------- सर्व. यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. यांनी कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
९. **गटविकास अधिकारी/पोलीस निरिक्षक--------------------------- सर्व**
१०. **मुख्याधिकारी** ------------------------------------------ मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,** यांनी नगर परिषद / नगर पंचायत कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
११. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला